# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई
# प्रेसनोट

**CB/64/2025**

| गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक 20/11/2025 |
|---|---|

**"शेअर्स मार्केट ट्रेडिंग व अमेरिकेतील नागरिकांचे संगणाकामध्ये Virus Attack करून फसवणुक करणाऱ्या 20 आरोपींना सायबर पोलीस ठाणे आणि गुन्हे शाखा यांनी छापा कारवाई करून केली अटक"**

---

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, श्री.संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई आयुक्तालयामधील बोगस कॉल सेंटरचा शोध घेवुन कारवाई करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

दिनांक 18/11/2025 रोजी मिलेनियम पार्क, बिल्डींग नं 03, चे तिसरा माळा, सेक्टर 03, तुर्भे, नवी मुंबई याठिकाणी काही इसम विविध बोगस कंपनीचे नावाने कॉल सेंटर चालवुन देशातील नागरिकांची शेअर्स मार्केट ट्रेडिंग मध्ये नफा मिळण्याचे अमिष दाखवून फसवणुक करता अशी गोपनीय माहिती वपोनि विशाल पाटील यांना प्राप्त झाली. त्याअनुषंगाने सपोआ प्रेरणा कट्टे आर्थिक गुन्हे शाखा/सायबर, नवी मुंबई व सपोआ अजयकुमार लांडगे, गुन्हे शाखा, नवी मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस पथके तयार करून सदर ठिकाणी छापा कारवाई केली असता सदर ठिकाणी **The Wealt Growth, The Capital Services, Sigma, Trade Knowledge Services तसेच Stock Vision**

या कंपन्यामध्ये 97 मुले व मुली संगणकावर तयार केलेल्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर चॅट तसेच कॉल वर बोलत असल्याचे दिसुन आले. सदर कंपनीचे कामकाजा करिता वापरत असलेले संगणकांची तपासणी केली असता त्यामध्ये विविध मोबाईल क्रमांकाने व्हॉटसअॅप लॉगिन करून त्याचे मार्फत शेअर्स मार्केट मध्ये गुंतवणुक केल्यास जास्त परतावा देण्याचे आश्वासन दिल्याचे व रक्कम स्विकारण्याकरिता पाठविण्यात आलेल्या बॅक खात्यांचे डिटेल्स तसेच नागरिकांनी त्यांची फसणुक होत असुन रक्कम परत मिळण्याबाबतचे चॅट देखील दिसुन आले.

नागरिकांना फसवणुकी करिता पाठविण्यात आलेल्या **71 बॅक** खात्यांचे ट्रान्झक्शन तपासले. त्यामधील **61 खात्यांमध्ये एकुण 12.29 कोटी** रक्कमेचे व्यवहार झाल्याचे दिसुन आले. सदर बॅक खात्यांची भारत सरकारच्या गृह मंत्रालयाने विकसीत केलेल्या **National Cyber Crime Reporting Portal (NCCRP)** वर काही बॅक खात्यांची तपासणी केली. **संपुर्ण देशातुन 31 सायबर फसवणुकीच्या तक्रारी नोंद असल्याचे दिसुन आले आहे.** सदर गुन्हयात अनेक बॅक खात्यांचा वापर केला असुन त्याचे विश्लेषण केलेनंतर फसवणुकीची रक्कम अजुन वाढण्याची शक्यता आहे.

तसेच सदर कॉल सेंटर कडुन मध्यरात्री 06.30 वा. ते पहाटे 03.30 वा. चे दरम्यान **IT Mac world Solution** या कंपनी मार्फत अमेरिकेतील नागरिकांच्या संगणकांमध्ये Ramsomware/Malware Attack केला जातो. त्यामुळे संगणक फ्रिज होवुन स्क्रिनवर Microsoft Error Code मेसेज दिसतो. त्यावर Microsoft Customer Support Number असे दाखवुन त्यामध्ये त्यांचे कॉल सेंटरचा VOIP नंबर नमुद असतो. सदर अमेरिकेतील नागरिकांना पर्याय नसल्यामुळे ते त्यांचे संगणकावर दिसणाऱ्या Microsoft Customer Support Number वर कॉल करतात. त्यांनतर कॉल सेंटर मधील कर्मचारी ते Microsoft Customer Support Centre मध्ये काम करत असल्याचे भासवुन व अमेरिकी नागरिकांची खोटी नावे धारण करून त्यांचा विश्वास संपादन करतात. त्या नागरिकांना काही संगणकीय सेंटिग मध्ये बदल करण्यास सांगुन त्यांच्या समस्याचे निराकरण केल्याचे भासवुन त्या मोबदल्यात त्यांचेकडुन पैसे वसुल करून फसवणुक करत असल्याची माहिती प्राप्त झाली.

सदर कॉल सेंटर ठिकाणी प्रत्येक कर्मचारी यांचेकडे नागरिकांशी कशा प्रकारे बोलावे याबाबतची स्क्रिप्ट कंपनीकडुन दिलेली होती. कॉल सेंटर मधील **38 मोबाईल फोन, 108 संगणका पैकी पुराव्याच्या दृष्टिने 21 सी.पी.यु., 5 लॅपटॉप, 5 एस.एस.डि. आणि 1 जी.एस.एम सर्वर** पंचनाम्या अंतर्गत जप्त करण्यात केले. सदर कारवाई बाबत सायबर पोलीस ठाणे, गुरक्र 55/2025 कलम 318(4), 319(2), 61(2) भा.न्यां.सं सह 66(सी), 66(डी) माहिति तंत्रज्ञान अधिनिय अन्वये गुन्हा दाखल केला. **सदर गुन्हयात अद्यापपर्यत 20 आरोपी अटक केले असुन दि.23/11/2025 पावेतो पोलीस कोठडी मंजुर आहे.**

सदर गुन्हयाची व्याप्ती खुप मोठी असुन गुन्हयात अनेक पाहिजे आरोपी सहभाग असल्याचे दिसुन येत आहे. गुन्हयाचा सखोल तांत्रिक तपास करून अनेक पाहिजे आरोपीतांना अटक करणेबाकी आहे. गुन्हयाचा अधिक तपास सायबर पोलीस ठाणेचे वपोनि. श्री.विशाल पाटील करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, श्री.अजयकुमार लांडगे, व सहाय्यक पोलीस आयुक्त, आ.गु.शा./सायबर, श्रीमती प्रेरणा कट्टे यांचे मार्गदर्शनाने सायबर पोलीस ठाणेचे वपोनि विशाल पाटील व पोनि गणेश जाधव तसेच वपोनि. शिंदे, मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा, वपोनि. भगत, कक्ष 01, गुन्हे शाखा यांचे नेतृत्वामध्ये सपोनि राजु आलदर, सपोनि विवेक भोईर, पोउपनिरी रोहित बंडगर, पोउपनिरी राहुल कोळी, पो.ह. संदेश गुजर, पो.ना. मंगेश गायकवाड यांनी केलेली आहे. सदर गुन्हयात महत्त्वाची तांत्रिक मदत सायबर तज्ञ अजय पंचोली व गौरव कारखेले यांनी केली आहे.

★★★★★★★★★★